स्थापना २३/०३/२०१८

# प्रेरणा फाऊंडेशन

नोंदणी क्रमांक :- महा/५६४/२०१८/ठाणे
Email : prernafoundation564@gmail.com

दिनांक :18/8/2023

मध्यवर्ती टपाल केंद्र
मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
अ.क्र.....................
18/8/2023

प्रती ,

1. माननीय नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई 32

**सावंतवाडी येथील रेल्वे स्थानकासंदर्भात निवेदन :-**

**विषय : सावंतवाडी रोड रेल्वे स्टेशन (कोंकण रेल्वे) प्रवाशांच्या मागण्या आणि गैरसोई संदर्भात निवेदन.**

**माननीय महोदय,**

या पत्राच्या माध्यमातून आपणास विनंती करतो की, कोकण रेल्वेच्या मार्गावरील जोडणारे महत्त्वाचे रेल्वे स्थानक सावंतवाडी स्थानकात विविध समस्या अनेक दिवसांपासून आहेत या समस्या लवकरात लवकर मार्गी लागाव्या यासाठी प्रवाशांनी अनेक वेळा संबंधित रेल्वे प्रवाशांना वेळोवेळी केले आहे परंतु संबंधित समस्या सोडवण्याबाबत आजपर्यंत दुर्लक्ष दिरंगाई झाली आहे गणेश उत्सव अगदी तोंडावर आहे कोकणातील गणेशोत्सव राज्यातील नाही तर संपूर्ण देशातील पारंपारिक पद्धतीने साजरा केला जाणारा मोठा उत्सव आहे लाखो चाकरमाने त्या उत्सवासाठी लवकरच कोकणाकडे रवाना होणार आहेत ही बाब लक्षात घेऊन सावंतवाडी स्थानकातील पुढील प्रमाणे असणाऱ्या समस्या रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर सोडून कोकणातील प्रवाशांना दिलासा द्यावा

**१)सावंतवाडी रेल्वे टर्मिनस चे उर्वरीत काम त्वरित पूर्ण करणे.**

टर्मिनस टप्पा १ चे काम जेमतेम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्याचे काम पूर्णपणे बंद आहे. ते काम मागे गेलेला ८.१४ कोटीचा निधी पुन्हा उपलब्ध करून चालू करण्यात यावे,अथवा स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत निधी मंजूर करून घेणे.

स्थापना २३/०३/२०१८

# प्रेरणा फाऊंडेशन

नोंदणी क्रमांक :- महा/५६४/२०१८/ठाणे

Email : prernafoundation564@gmail.com

दिनांक : 18/8/2023

३)सावंतवाडी स्थानकाचा समावेश केंद्र सरकारच्या अमृत भारत स्थानक योजनेत करणे आणि येथील स्थानकाचा पर्यटनदृष्ट्या विकास करणे.

सध्या असलेली इमारत ही पूर्ण जीर्ण झालेली असुन ती प्रवासी वापरास अयोग्य आहे.अनेकवेळा प्रवाशाच्या डोक्यावर हातावर सिमेंटचे तुकडे पडलेले आहेत. पण रेल्वे प्रशासन केवळ त्याठिकाणी सिमेंट लावून वेळ निभावून नेत आहे,हे सर्व थांबवायच असेल तर नविन इमारत बांधण्याची गरज आहे.परंतु अगोदरच टर्मिनस कामाच्या टप्पा -२ मधे टर्मिनस इमारतीसाठीचा आराखडा मंजुरी होऊन टेंडर ही काढण्यात आले होते, परंतु निधीची कमतरता असल्याचे कारण देत तो निधी रेल्वे प्रशासनाने मागे घेतला, तो पुन्हा देऊन नव्या इमारतीचे काम सुरू करावे.

४)PRS सुविधा पुर्णवेळ उपलब्ध करणे

५)प्लॅटफॉर्म क्रमांक १ व प्लॅटफॉर्म क्रमांक ३ ला जोडणारा FOB ला पूर्ण शेड टाकणे.

६)कोरोना काळात काढण्यात आलेल्या गाड्यांचे थांबे परत द्यावेत.

गाडी क्रमांक १२४३१/३२ त्रिवेंद्रम - ह.निजामुद्दीन - त्रिवेंद्रम राजधानी एक्सप्रेस व १२२०१/०२ लोकमान्य टिळक टर्मिनस - कोचीवल्ली- लोकमान्य टिळक टर्मिनस गरीबरथ एक्सप्रेसचे थांबे कोरोना काळात बंद केले ते त्वरीत पूर्ववत करण्यात यावेत.

७)खालील गाड्यांना सावंतवाडी स्थानकावर थांबे देण्यात यावेत त्यासाठी पाठपुरावा करणे.

सावंतवाडी रोड स्थानकावर काही ठराविक रेल्वे गाड्या थांबतात त्यामुळे दिल्ली, विदर्भ, गुजरात व इतर ठिकाणी जाण्यासाठी गाड्यांचा पर्याय येथे उपलब्ध नाहीये,त्यामुळे प्रवासी असताना देखील इतर स्थानकावर जावे लागते. त्यासाठी खालील थांब्याची फार गरज आहे.

i)१२१३३/३४ छ.शि.म.ट. मुंबई - मंगलोर जंक्शन - छ.शि.म.ट मुंबई एक्सप्रेस.(दैनिक)

ii)१२४४९/५० मडगाव जंक्शन - चंदिगड - मडगाव जंक्शन गोवा संपर्क क्रांती एक्सप्रेस.(द्विसाप्ताहिक)

iii)१६३४५/४६ एल.टी.टी मुंबई - त्रिवेंद्रम - एल.टी.टी. मुंबई नेत्रावती एक्सप्रेस.(दैनिक).

# प्रेरणा फाऊंडेशन

स्थापना २३/०३/२०१८

नोंदणी क्रमांक :- महा/५६४/२०१८/ठाणे

Email : prernafoundation564@gmail.com


दिनांक : 18/8/2023

iv)१२६१७/१८ एर्नाकुलम - ह निजामुद्दीन - एर्नाकुलम मंगला एक्सप्रेस.(दैनिक).

v)१२६१९/२० एल.टी.टी. मुंबई - मंगलोर - एल. टी.टी मत्स्यगंधा एक्सप्रेस.(दैनिक).

vi)०११३९/४० नागपूर - मडगाव - नागपूर स्पेशल एक्सप्रेस.(द्विसाप्ताहिक).

vii)२२२२९/३० छ.शि.म.ट. मुंबई - मडगाव - छ.शि.म. ट. मुंबई वंदे भारत एक्सप्रेस.

८)पेडणे - कारवार या मेमु रेल्वेगाडीचा सावंतवाडी पर्यंत विस्तार करणे

९)प्रवाशांचा सुविधेसाठी प्लॅटफॉर्म क्रमांक १,२ व ३ वर शेड उभारणे.

निधीच्या कमतरतेमुळे "सावंतवाडी टर्मिनस" नावारूपास येणार नाही ही वस्तुस्थिती आहे त्यासाठी निधीची उपलब्धता करण्यासाठी स्थानिक आमदार, खासदार यांच्याकडे पाठपुरावा करणे अपेक्षित आहे.

आपली नम्र

Prerna

सौ. दीप्ती दत्ताराम गावकर

(प्रेरणा फाऊंडेशन संस्थापिका /अध्यक्षा )

अध्यक्ष
प्रेरणा फाऊंडेशन

प्रेरणा फाऊंडेशन ★ स्थापना - २३/०३/२०१८ ★ महा/५६४/२०१८

प्रत रवाना... (मागे पहा )

# प्रेरणा फाऊंडेशन

स्थापना २३/०३/२०१८

नोंदणी क्रमांक :- महा/५६४/२०१८/ठाणे

Email : prernafoundation564@gmail.com


दिनांक : 18/8/2023

प्रत माहितीकरिता रवाना

1 माननीय नामदार श्री. अश्विनी वैष्णव साहेब
केंद्रीय रेल्वेमंत्री भारत सरकार
रेल्वे भवन रफी मार्ग नवी दिल्ली

2. माननीय नामदार श्री रावसाहेब दानवे पाटील साहेब
रेल्वे राज्यमंत्री भारत सरकार नवी दिल्ली

3. माननीय नामदार श्री नारायणजी राणे साहेब
केंद्रीय मंत्री लघुउद्योग भारत सरकार ज्येष्ठ नेते कोकण विभाग

4. माननीय नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई 32

5. माननीय नामदार श्री रवींद्रजी चव्हाण साहेब
पालकमंत्री सिंधुदुर्ग जिल्हा तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई 32

6. माननीय महाव्यवस्थापक साहेब
मध्य रेल्वे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई 400001

7. माननीय जनसंपर्क अधिकारी साहेब
कोकण विभागीय रेल्वे मंडळ मुंबई

प्रेरणा फाऊंडेशन २३/०३/२०१८